ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३७ | पुणे, बुधवार, २ जून, १९७१ | अंक ११

कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?

# किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप




## खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्ट्यामुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि;** उद्योग भवन, टिळक रोड, पुणे २

STUKA 735

D. E. Society's

**Brihan Maharashtra College of Commerce**
**Poona-4.**

## "Admission For The Academic Year 1971-72."

The College will reopen on 15th June, 1971 for the academic year 1971-72. Enrolment will begin from 2nd June 1971. In view of the limited accommodation, admissions to the B. Com. Pt. I, S. Y. B. Com., T. Y. B. Com. and M. Com. classes will be given in the first instance to the students of this College. Students from other Colleges will be admitted, only if some vacancies are available. The students who were in this College last year and who wish to continue their education in higher classes in this College in the ensuing academic year should apply for admission before 10-6-1971. They must bring with them two copies of an Identity card size photograph.

**Hours for Admissions** :— 11·00 a. m. to 2·00 p. m.

(1) Students should note the following College timings for the new academic year :—

P. D. Com. and T. Y. B. Com. : 8-00 a.m. to 11-20 a.m.
F.Y.B. Com. & S. Y. B. Com. : 11-45 a. m. to 2-45 p.m.

(2) The programme of admission to the various classes will be as follows :—

| | |
|---|---|
| S. Y. B. Com. and T. Y. B. Com. | From 2nd June to 5th June. |
| P. D. Com. | : From 6th June to 10th June. |
| B. Com. Part I | : From 14th June to 18th June. |
| M. Com. | : From 16th June to 20th June. |

(M. Com. Classes will begin from 1st July 1971).

(3) Students seeking admission to the Pre-Degree Commerce class should bring with them the following along with the admission form :—

(1) S. S. C. Statement of Marks (Two typed copies of the same)
(2) School leaving certificate ( do )
(3) Identity card-size photograph (Two copies)

Forms of admission and Copies of the Prospectus will be available in the College Office during Office hours.

N. K. Kulkarni
Principal.



# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १६,३२,००,००० |
| ठेवी | रु. | ८१,१५,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | १७०,९१,००,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक



तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी | दूरध्वनी | मुख्य कार्यालय : २६७८०१, २६७८०२, २६७८०३
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट)
उपकार्यालय नं. १ : २६०३०६ नं. २ : २९०००६

# दि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७० अखेर बँकेचे भागभांडवल ७ कोटी ८१ लाख, गंगाजळी ५६ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ३६ कोटी व येणे कर्ज १०४ कोटी आहे.

वी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

☆ अर्थ ☆

बुधवार, २ जून, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## करवाढ आणि सामाजिक उद्दिष्टे

### कार्यक्षम विनियोगाचे महत्त्व

लोकसभेत करविषयक योजना मांडताना श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी काही मूलभूत तत्त्वांचा उल्लेख केला. ते म्हणाले, "(अ) कराची योजना सुटसुटीत केली पाहिजे. त्यामुळे कर भरणाऱ्याला आणि कर वसूल करणाऱ्याला हलके वाटले पाहिजे; कर चुकविणाऱ्यास वाव कमीत कमीत मिळाला पाहिजे. (ब) आर्थिक शक्ती एकवटली जाऊ नये अशा रीतीने आणि उत्पन्न व संपत्ती ह्यांच्या वाटणीमधील भेद कमी होईल अशा प्रकारे समाजाच्या वेगवेगळ्या भागांवर कराचा बोजा विखुरला गेला पाहिजे. (क) करवाढीमुळे गरजेच्या जिनसांच्या किंमतीची पातळी शक्यतो वाढू दिली जाता कामा नये." प्रारंभी अशा रीतीने करवाढीची बैठक स्पष्ट केल्यावर त्यांनी करवाढीचा तपशील दिला आणि आपल्या भाषणाचे अखेरीस ते म्हणाले, "नव्या करांपैकी फारच थोडा भाग सामान्य माणसास सोसावा लागेल ह्याची काळजी घेण्यात आली आहे."

अंदाजपत्रकात सुचविण्यात आलेली करवाढ वरील निकषावर ताडून पाहिली तर आपणांस काय आढळते ? श्रीमंतांवर जबर कर बसविला आहे हे खरे आहे. पण गरिबांवरही कराचा बोजा बराच पडणार आहे. पेट्रोलवरील एक्साइज ड्यूटीत प्रत्येक लिटरमागे २० पैसे एवढी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सरकारला चालू वर्षी ३६·३० कोटी रुपये मिळतील. पेट्रोलच्या वापरात काटकसर करण्यासाठी ही करवाढ करण्यात आली आहे, असे अर्थमंत्री म्हणाले. परंतु, करवाढीमुळे पेट्रोलचा वापर कमी होणार नाही आणि त्याचा बोजा अप्रत्यक्ष रीतीने सामान्य-जनतेवर पडल्याविना राहणार नाही.

अर्थमंत्र्यांना ३९७ कोटी रु. ची तूट पूर्णपणे भरून काढणे शक्य झालेले नाही. २२० कोटी रु. चे जादा कर त्यांनी सुचविले आहेत. त्यांपैकी १३२ कोटी रु. अप्रत्यक्ष करांच्या द्वारा मिळविले जाणार आहेत. अप्रत्यक्ष करांचा बोजा प्रथम एका गटावर पडला तरी तो हळूहळू सर्व समाजावर विभागला जातो, हा नित्याचा अनुभव आहे. पाव खाणाऱ्यात चांगल्या उत्पन्नदारांचेच प्रमाण मोठे असते, असे मैद्यावरील नव्या कराचे अर्थमंत्र्यांनी समर्थन केले आहे आणि त्याचे उत्पन्न (७·४ कोटी रु.) मुलांच्या कल्याणावर खर्च केले जाईल असे सांगितले आहे. करवाढीच्या उत्पन्नाच्या विनियोगाचे महत्त्व लक्षात घेऊन लोकांनी बिनतक्रार महाग पाव घ्यावा अशी त्यांची अपेक्षा आहे. तयार कपड्यावरील कराचेही समर्थन त्यांनी केले आहे, ते पटणारे नाही. मध्यम आणि त्या-खालील पातळीच्या वर्गाला अप्रत्यक्ष करांच्या बोजाची झळ लागल्याविना राहणार नाही.

गरिबी हटवावयाची असली तरी त्यासाठी लागणारे सामर्थ्य अखेर गरिबांकडूनही जमा करावे लागणार हे उघड आहे. इतकेच काय, पुरेसे आर्थिक सामर्थ्य निर्माण होऊन त्याचा किफायतशीर आणि कार्यक्षमतेने वापर करून त्याचे फळ गरिबांच्या हाती लागण्यास कित्येक वर्षे लागतील. चालू पिढीला ते फळ कदाचित बघायलाही मिळणार नाही. तेव्हा खरा प्रश्न आहे सरकारने स्वतःकडे घेतलेल्या आर्थिक सामर्थ्याचा यथायोग्य वापर होण्याचा. ह्या दृष्टीने पब्लिक सेक्टर मधील उपक्रमांचे चित्र फारसे आशा-दायक नाही. सरकारने ह्या बाबतीत धाडस आणि अप्रियता पतकरण्याची तयारी दाखविल्याखेरीज केवळ अंदाजपत्रकाच्या द्वारा कोणत्याच क्षेत्रात उत्पादनवाढ आणि समाजवादी वाटप सरकार घडवून आणू शकणार नाही. सरकारच्या हाती येणारा प्रत्येक पैशाचा शंभर टक्के विनियोग मध्ये गळती न लागता उत्पादनवाढीप्रीत्यर्थ काटकसरीने होणे अगत्याचे आहे.

---

## स्वस्तिकला महाराष्ट्र बँकेचे किती भांडवल मिळणार ?

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे स्वस्तिक रबर प्रॉडक्टसमध्ये विलिनीकरण करण्याचा ठराव दोन्ही कंपन्यांच्या भागधारकांनी एकमताने मजूर केला होता. विलिनीकरणाच्या योजनेप्रमाणे, महाराष्ट्र बँकेच्या ज्या भागधारकांना स्वतःच्या भागांचा रोखीने मोबदला हवा होता, त्यांनी त्याची मागणी स्वस्तिककडे नोंदविण्याची अखेरची तारीख २९ मे, १९७१ ही होती. सुमारे ३२ लक्ष रु. रोख मागणीची नोंद स्वस्तिककडे झाली आहे, असे समजते. म्हणजे स्वस्तिकला जवळ जवळ २ कोटी रुपयांचे भांडवल स्वतःसाठी मिळेल.

---

# दृष्टिक्षेपात अंदाजपत्रक

( आकडे कोटी रुपयांचे )

**महसुली उत्पन्न**

| | ७०–७१ अंदाज | ७०–७१ दुरुस्त | ७१–७२ अंदाज |
|---|---|---|---|
| करांचे उत्पन्न | ३१३४ | ३१९७ | ३४०३ +२२० |
| राज्यांचा वाटा | ७४४ | ७५५ | ८५० +४३ |
| केन्द्राचे एकूण कर उत्पन्न | २३९० | २४४२ | २५५३ +१७७ |
| इतर उत्पन्न | ९०० | ४९४ | १००९ |
| एकूण उत्पन्न | ३२९० | ३३९१ | ३५६२ +१७७ |
| **भांडवली जमा** | | | |
| बाजारातील कर्जे | १६२ | १३६ | १६८ |
| परकीय मदत (पीएल४८०वगळून) | ४०० | ३५५ | ३२४ |
| पी. एल ४८० मदत | १३२ | १२२ | ११३ |
| कर्जफेड | ८२५ | ९३० | ९३० |
| इतर उत्पन्न | ३०५ | ५६२ | ४८९ |
| एकूण भांडवली जमा | १८२४ | २१०५ | २०२४ |

**महसुली खर्च**

| | ७०–७१ अंदाज | ७०–७१ दुरुस्त | ७१–७२ अंदाज |
|---|---|---|---|
| मुलकी खर्च | १४९८ | १५२४ | १७२५ |
| संरक्षण खर्च | १०१८ | १०४० | १०७९ |
| राज्ये व केन्द्र प्रदेशांना अनुदान | ६३६ | ६२९ | ७८३ |
| एकूण खर्च | ३१५२ | ३१९३ | ३५८७ |
| शिल्लक किंवा तूट – | +१३८ | +१९८ | –२५ +१७७ |
| **भांडवली खर्च** | | | |
| मुलकी खर्च | ५२५ | ६८४ | ४९१ |
| संरक्षण खर्च | १३४ | १४३ | १६३ |
| रेल्वे | १५० | १२६ | १५१ |
| पोस्ट व तार | ३५ | १७ | ३८ |
| राज्य व केन्द्र प्रदेशांना कर्जे | ८७८ | १०४० | ९६६ |
| इतर कर्जे | ४६७ | ५२४ | ५८७ |
| एकूण भांडवली खर्च | २१८९ | २५३३ | २३९६ |
| भांडवली तूट | ३६५ | ४२८ | ३७२ |
| एकूण तूट | २२७ | २३० | ३९७ +१७७ |

+ हे आकडे अंदाजपत्रकातील तरतुदींचे आहेत.

## सिगारेट्सच्या किमती किती वाढतील ?

वेगवेगळ्या सिगारेट्सच्या किमती नव्या एक्साइज ड्यूटीमुळे अंदाजे खालील प्रमाणे होतील :—

| ब्रँड | | जुनी किंमत ( पैसे ) | नवी किंमत ( पैसे ) |
|---|---|---|---|
| चारमिनार | (१०) | ३३ | ३६ |
| बेअर स्पेशल | (१०) | ३३ | ३६ |
| बर्कले | (१०) | ५८ | ६४ |
| सिसर्स | (१०) | ५८ | ६४ |
| विल्स नेव्ही कट | (१०) | १०० | ११६ |
| रेड अँड व्हाइट | (१०) | ११० | १२८ |
| पनामा | (२०) | ११५ | १३१ |
| कॅप्स्टन | (१०) | १३० | १५९ |
| गोल्ड फ्लेक | (१०) | १६० | १९६ |

## धूम्रपान सोडले तरी वाहवा; न सोडले तरी वाहवा

"धूम्रपान करणारांनी सिगारेट्सवरील करवाढीमुळे धूम्रपान सोडले किंवा सोडले नाही, तरी त्यापासून देशाचा फायदाच होईल. धूम्रपान करणाऱ्या प्रत्येकाला स्वतःच्या प्रकृतीची चिंता वाटण्याची वेळ त्याच्या आयुष्यात केव्हातरी येतेच. ज्यांना सिगारेट्सचे व्यसन सोडता येणार नाही, त्यांना आपण धूम्रपानाच्या द्वारा अधिक कर देऊन राष्ट्रीय हितसंवर्धनास हातभार लावीत असल्याचे तरी समाधान लाभेल. म्हणजे, त्यांनी धूम्रपान सोडले तरी वाहवा, न सोडले तरी वाहवा." —अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण.

## रशियाचा न्यूजप्रिंट घेणार

भारत सरकारने रशियाकडून १९७०–७१ मध्ये ५·७१ कोटी रु. किमतीचा ४०,००० मेट्रिक टन न्यूजप्रिंट कागद घेण्याचा करार केला आहे.

## रक्तदानाचा धंदा करणारे दलाल

अत्यवस्थ असलेल्या रोग्यांना वाचविण्यासाठी योग्य त्या प्रकारचे रक्त लागते. दिल्लीमधील रुग्णालयांना आणि शुश्रूषागृहांना असे रक्त पुरविण्याचा धंदा करणारे काही दलाल आहत; आणि रक्तदान करणारे बहुतेक लोक मोलमजुरी करणारे आहेत. त्यांची संख्या सुमारे ५ हजार आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी ते दलालामार्फत मजूनमधून रक्तदान करीत असतात. दलालांची माणसे राजधानीतील इस्पितळात व शुश्रूषागृहात असतात. त्यांच्या गरजा ते आपल्या मालकांना कळवितात व मग योग्य ती माणसे रक्तदानासाठी हजर करण्यात येतात. रक्तपुरवठ्याच्या ह्या खाजगी व्यापारात दलालांना चांगला फायदा होतो. एका रक्तदानासाठी ते देणाऱ्याला १० ते १५ रुपये देण्यात येतात. एका वेळी ३५० सी. सी. रक्त काढून घेण्यात येते. ज्या रुग्णाला रक्ताची आवश्यकता असते त्याला पैशाबद्दल घासाघीस करण्यास वेळ नसतो. परिणामी रुग्णाला रक्तासाठी ८० ते १५० रुपयांपर्यंतही रक्कम कधीकधी मोजावी लागते. दलालांनी हा धंदा पद्धतशीरपणे चालविलेला आहे. त्यांच्याजवळ रक्तदान करणारांची यादी व त्यांच्या रक्ताचा गट आणि इस्पितळाची गरज ह्यांची तपशीलवार माहिती असते. त्यामुळे आणीबाणीच्या वेळी योग्य त्या रक्तगटाचा माणूस ते हुकमी मिळवू शकतात. दलालांचा धंदा चांगला चालला आहे. कारण स्वेच्छेने रक्तदान करणारांची संख्या पुरेशी नाही. स्वेच्छेने केलेल्या रक्तदानामुळे राजधानीतील इस्पितळांची अवघी ५ टक्केच गरज भागते. एका व्यक्तीचे रक्त तीन महिन्यांतून एकदाच काढता येते.

## युरोपीय देशात लंघनचिकित्सेची वाढती लोकप्रियता

रोगपरिहारासाठी लंघनाचा उपाय योजण्याची प्रथा भारतात फार प्राचीन काळापासून चालू आहे. आता ही पद्धत युरोपीय देशातही वाढत्या प्रमाणावर लोकप्रिय होऊ लागली आहे. मॉस्कोमधील एका मोठ्या वैद्यकीय संशोधन संस्थेतील डॉक्टर सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत. हिंदी वैद्यकीय औषधपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी ते आले आहेत. त्यांच्या मताने उपवासाने केवळ शारीरिक रोगाचाच परिहार करता येतो असे नव्हे, तर काही प्रकारच्या मानसिक दुखण्यावरही उपवासाची मात्रा उत्तम लागू पडते. उपवासाने रोग बरा करण्याची पद्धत ते १९४८ सालापासून वापरत आहेत. ह्या पद्धतीने जवळ जवळ ४ हजार रोग्यांना त्यांनी रोगमुक्त केले आहे. ज्या रोग्यांची पचनसंस्था बिघडलेली आहे त्यांना आणि ज्यांच्या अंतस्त्रावी ग्रंथीत काही बिघाड झाला असेल त्यांना ह्या पद्धतीचा विशेष फायदा होतो असा त्यांचा अनुभव आहे. त्याचप्रमाणे ज्यांना लठ्ठपणाचा त्रास होतो त्यांनाही लंघनचिकित्सा उपकारक ठरते. १८० ते २१० किलोग्रॅम वजन असलेल्या अनेकांनी उपवास करून आपले वजन ५० टक्क्यांनी कमी करून घेतल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यांच्या उपवासाच्या उपचारात रोग्याला पहिले २० ते २५ दिवस काहीच अन्न देण्यात येत नाही. पाणी पिण्यास मात्र मुभा असते. उपचार चालू असताना कोणतेही औषध देण्यात येत नाही आणि धूम्रपानाला पूर्ण बंदी करण्यात येते. रोग्याला रोज थोडाबहुत हलका व्यायामही करावा लागतो. उपवासाने रोगपरिहार करण्याची पद्धत पोटातील व्रण, दमा, अनेक प्रकारचे त्वचारोग बरे करण्यास उपयुक्त ठरते असा त्यांचा अनुभव आहे.

## सार्वजनिक मालकीचे पोलादकारखाने तोट्यात का ?

सार्वजनिक क्षेत्रातील पोलादाचे कारखाने कार्यक्षम का नाहीत असा प्रश्न वारंवार विचारला जातो. संघराज्याचे पोलाद व खाणीमंत्री श्री. मोहन कुमारमंगलम् ह्यांनी ह्या बाबतीत आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. ते म्हणतात की हे कारखाने नीट न चालविण्याची अनेक कारणे आहेत. परंतु त्या सर्वांत त्यांची देखभाल व दुरुस्ती ह्यांच्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही हे कारण सर्वांत प्रमुख आहे. कारखान्याच्या आरंभ काळातही अशा देखरेखीची आवश्यकता असते. त्याच काळात ती पुरेशी व नीट केली जात नाही. दुर्गापूर आणि रुरकेला येथील पोलादाच्या कारखान्याबाबत ही गोष्ट विशेष खरी आहे. अशा देखरेखीच्या अभावी वरील कारखाने मोठ्या प्रमाणावर बंद पडले. त्यामुळे अर्थातच उत्पादनावर विपरित परिणाम झाला. ह्याच्या उलट भिलाई येथील पोलादाच्या कारखान्यात प्रारंभीच्या काळातही यंत्रसामग्री कार्यक्षम राखण्याचे काम नीट करण्यात आले. त्यामुळे त्या कारखान्याची कामगिरी इतर कारखान्यांपेक्षा चांगली झाली. खाजगी मालकीच्या पोलाद कारखान्यातील नोकरवर्ग हा बराच अनुभवी आहे. त्यामधील काही वरिष्ठ अधिकारी तर कित्येक वर्षे अनुभव घेतलेले आहेत. उलट हिंदुस्थानात स्टील कंपनी ही फक्त १५ वर्षांची आहे. अर्थातच तिच्या नोकरवर्गाला जितका अनुभव असावयास पाहिजे तितका नाही. बोकॅरो येथे उभारण्यात येत असलेला चौथ्या पोलादाच्या कारखान्याचा पहिला टप्पा १९७३ च्या मार्चपर्यंत पुरा होईल. नंतर त्याची उत्पादनक्षमता २५ लाख टनांपर्यंत वाढविली जाईल.

## अमेरिकन वकिलाची भारत-प्रशंसा

अमेरिकेचे भारतातील वकील श्री. कीटिंग हे सध्या आपल्या सरकारशी सल्लामसलत करण्यासाठी मायदेशी गेले आहेत. तेथे एका प्रसंगी बोलताना त्यांनी भारत-अमेरिका परस्पर संबंधांविषयी भाषण केले. ते म्हणाले की भारतासारख्या उपखंडातील फार मोठ्या लोकसंख्येचे भवितव्य राजकीय अस्थिरतेने झाकळलेले आहे. पण ह्या उपखंडात भारताचे सरकार स्वतंत्र सरकार म्हणून एका दीपस्तंभासारखे उभे आहे. अमेरिकेने भारताच्या स्वातंत्र्याला आणि आर्थिक विकासाला नेहमीच पाठिंबा दिलेला आहे. आजही अमेरिकेचे हेच धोरण आहे. भारताने फार कष्टाने मिळवलेले स्वातंत्र्य टिकवून धरण्यात अमेरिकेचेही हित आहे. भारताची लोकसंख्या ही जगाच्या लोकसंख्येपैकी एक सप्तमांश आहे. तिने आर्थिक भरभराटीचा आपला स्वतःचाच मार्ग शोधून काढावा.

### डी. डी. टी. न वापरल्यास रोगराई

डी डी. टी. सारखी जंतुनाशके वापरल्याने निसर्ग दूषित होत असल्याची तक्रार पाश्चात्य देशांत करण्यात येते. काही देशांतून तर ह्या औषधाच्या वापराला मनाईही करण्यात आली आहे. जागतिक आरोग्यसंघटनेने मात्र ह्या बाबतीत वेगळा सूर काढला आहे. जंतुनाशक औषध म्हणून डी. डी. टी. चा वापर करण्याचे बंद झाल्यास जगात मोठ्या प्रमाणावर रोगराई पसरण्याचा धोका आहे असे संघटनेने जाहीर केले आहे. ह्या बाबतीत सिलोनचे उदाहरण देण्यात आले आहे. १९६३ अखेर सीलोनमध्ये ह्या औषधाचा वापर करण्यात येत होता. त्यामुळे तेथील हिवताप पूर्णपणे नाहीसा झाला होता. पण पुढे काही कारणांनी फवारे मारणे बंद झाले आणि तापसरी पुन्हा उफाळली.

### कुटुंबनियोजनासाठी देशी गोळीचा शोध

राज्य सरकारांच्या आरोग्य खात्याच्या सचिवांची बैठक दिल्ली येथे भरविण्यात आली होती. परिषदेच्या शेवटच्या सभेत मध्यवर्ती सरकारच्या आरोग्य खात्याचे सचिव श्री. दास म्हणाले की पश्चिम युरोपीय देशांत कुटुंबनियोजनासाठी उपयोगी पडणाऱ्या गोळ्यांचा शोध लागलेला आहे. परंतु ह्या गोळ्या भारतामधील परिस्थितीत उपयोगी पडण्यासारख्या नाहीत. म्हणून देशातील सामग्रीचा उपयोग करून योग्य प्रकारची गोळी तयार करण्यासाठी प्रयोग करण्यात येत होते. ह्या गोळ्या तयार झाल्या असून त्यांचा वापरही प्रयोगादाखल करण्यात येत आहे. ज्या केंद्रातून ह्या गोळ्या वापरण्यासाठी देण्यात आल्या होत्या तेथे जमविण्यात आलेल्या माहितीवरून त्या बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाल्याचे आढळून आले आहे.

---

### गेल्या सत्तर वर्षांत युद्धामुळे ९ कोटी लोकांना मृत्यू


विसावे शतक सुरू झाल्यापासून आतापर्यंत ९,००,००,००० लोक युद्धात मृत्यू पावले, असे इस्तंबूल येथे भरलेल्या २१ व्या आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस काँग्रेसमध्ये सांगण्यात आले. पहिल्या महायुद्धाने २ कोटी सैनिकांचे आणि नागरिकांचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या बळी घेतले. दुसऱ्या महायुद्धामुळे ५ ते ६ कोटी जणांना प्राणास मुकावे लागले. ह्या वेळी सैनिकांपेक्षा नागरिकांचेच मृत्यू अधिक झाले. कोरिअन युद्धात १० लाखांपेक्षा अधिक सैनिक कामास आले; युद्ध, तज्जन्य रोगराई इत्यादींमुळे सुमारे ५० लक्ष लोक मृत्युमुखी पडले. व्हिएटनाम युद्धामध्ये १० लक्ष लोक तरी दगावले असावेत. आताच्या युद्धात सैनिकांपेक्षा सामान्य नागरिकांचेच अधिकाधिक बळी पडतात.

---

### इलेक्ट्रॉनिक उपकरणांची निर्गत

भारताने १९७०-७१ मध्ये ७.५ कोटी रुपये किमतीच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांची निर्गत केली.



## पाणीपुरवठ्याच्या कामांना अग्रहक्क देणार

भारत सरकार आणि नियोजन समिती ह्यांनी चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची फेरतपासणी करण्यास प्रारंभ केला आहे. कार्यक्रमाची अमलबजावणी करताना मधूनमधून त्याचा फेरविचार करण्याची प्रथा प्रथमच पाडण्यात येत आहे. फेरतपासणीचा एक परिणाम म्हणून देशातील पाणीपुरवठ्यांच्या कामावर अधिक भर देण्यात येणार आहे. पाणीपुरवठ्यांच्या कामांना अग्रहक्क दिल्यास ग्रामीण भागांतील बेकारी हटविण्यास ताबडतोब मदत होऊ शकते आणि शेतीच्या उत्पादनात तातडीने १०० टक्के वाढ होऊ शकते. आर्थिक नियोजन सुरू झाल्याला आता २० वर्षे होऊन गेली आहेत. ह्या अवधीत पाणीपुरवठ्यामुळे ओलिताखाली आलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळात जवळजवळ दुपटीने वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे अन्नधान्याचे उत्पादनही ५ कोटी टनांवरून १० कोटी टनांपर्यंत वाढलेले आहे. तथापि जगात धान्याच्या दरडोई खपात जी वाढ होत आहे त्याच्याशी तुलना करता धान्याची ही उत्पादनवाढ अपुरी आहे. जगात दरडोई दरसाल सरासरी एक चतुर्थांश टन अन्नधान्याचा खप होत असतो. ह्या सरासरीच्या बरोबर येण्यासाठी भारताला दरसाल १४ कोटी टन अन्नधान्याची निमती करावी लागेल. वाढत्या लोकसंख्येची जबाबदारी लक्षात घेतली तर १९८० च्या सुमारास भारताला १८ कोटी टन अन्नधान्य उत्पादन करावे लागेल. तरच दरडोई खपाची जागतिक सरासरी भारताला टिकवता येईल. ह्याचा अर्थ असा की उत्पादनवाढीचा सध्याचा वेग अपुरा असून तो दुप्पट तरी झाला पाहिजे. सध्या शेतीखाली असलेल्या जमिनीपैकी २५ टक्के जमीन पाणीपुरवठ्याच्या क्षेत्रात आली आहे. ती ३७ टक्के तरी झाली पाहिजे असा अंदाज करण्यात आला आहे.

---

## अमेरिकन कंपन्यांना वाजवी नुकसानभरपाई

भारतामधील सर्वसाधारण विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. ह्या कंपन्यांत काही अमेरिकन कंपन्याही आहेत. विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करणे ही बाब भारत सरकारच्या अखत्यारातील आहे, असेच अमेरिकन सरकारचे मत आहे. म्हणून संबंधीत कंपन्यांना योग्य ती नुकसानभरपाई मिळाल्यास सरकारची काही तक्रार राहणार नाही. मात्र नुकसानभरपाई गैरवाजवी कमी मिळाल्यास अमेरिका आपले वजन खर्च करील. तसे म्हटले तर अमेरिकेतही राष्ट्रीयीकरण हा काही वादाचा विषय राहिलेला नाही. अलीकडे तेथील रेल्वेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. विमान कारखान्यांना तेथे मदत देण्यात येते. तरीही तो धंदा नीट चाललेला नाही. त्याचेही राष्ट्रीयीकरण होण्याची शक्यता आहे.





होय!

आर्थिक बाबींचा प्रश्न उभा राहील
तर लघुउद्योग धंदाचा पुरोगामी
चालक नक्की तेंच करील

बँक ऑफ इंडिया लघुउद्योग धंद्यांना
खास सवलतीच्या ८ टक्के दराने वाजवी अनामत
रक्कम घेऊन कर्ज देते.

■ अधिक माहितीसाठी
आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

बँक ऑफ इंडिया

RAAS/B/118 B MAR

## पाकिस्तान सर्वनाशाच्या कड्यावर उभा आहे

१९७१ च्या मार्च महिन्याच्या अखेरीस पश्चिम पाकिस्तानच्या सरकारने पूर्व बंगालमधील अवामी लीगवर व पर्यायाने तेथील जनतेविरुद्ध शस्त्र उपसले. तेव्हापासून पूर्व बंगालमध्ये अपरिमित हानी झाली असून पाकिस्तान आर्थिक विनाशाच्या कड्यावर उभे असल्याचे मत अमेरिकेच्या एका वार्ताहराने व्यक्त केले आहे. हा वार्ताहर लष्कराने मुद्दाम बोलावलेल्या पत्रकारांच्या तुकडीत होता. पूर्व पाकिस्तानचा दौरा केल्यावर पाठविलेल्या वार्तापत्रात तो म्हणतो की, प्रथमपासूनच दोन भागात अस्तित्वात आलेले पाकिस्तान २३ वर्षांच्या काळात आता राजकीय आणि आर्थिक विनाशाच्या काठावर उभे आहे. पूर्व बंगालमधील युद्धावर पाकिस्तान दररोज २० लाख डॉलर्स अथवा १॥ कोटी रुपये खर्च करीत आहे. तेथे चालू असलेल्या यादवीमुळे बाजारपेठा उध्वस्त झाल्या आहेत आणि शहरे सपाट झाली आहेत. महत्त्वाचे रस्ते आणि रेल्वेमार्ग अनेक ठिकाणी खंडित झाले आहेत. परिणामी दळणवळण अतिशय विस्कळीत झाले आहे. उद्योगधंदे व व्यापार ह्यांचे इतके नुकसान झाले आहे की त्याची मोजदादही करता येणार नाही. त्याशिवाय आर्थिक विकास पूर्णपणे थांबला आहे. त्याच्या परिणामाचा अंदाजही करता येणार नाही. तोफांच्या भडिमारामुळे, आगीमुळे आणि हेतुपूर्वक केलेल्या नासधुशीमुळे लक्षावधी डॉलर्सचे नुकसान झाले आहे. ५५ तागाच्या गिरण्या उत्पादनक्षमतेच्या १५ ते २० टक्केच काम करीत आहेत. पाकिस्तानच्या लष्कराने अमेरिकन बोटी व जपानी जीपगाड्या लोकांना मदत देण्यासाठी वापरण्याऐवजी युद्धासाठी वापरण्यास प्रारंभ केला आहे.

पूर्व पाकिस्तानातील प्रमुख बंदर चितगाव हे माल तुंबून राहिल्यामुळे निकामी झाले आहे. तेथे सुमारे ४ लाख टन वजनाचा माल बोटीवरच पडून आहे. एका महिन्यात ह्या बंदरातून जितक्या मालाची चढउतर होते त्यापेक्षा १ लाख टन अधिक माल साचून राहिला आहे. सर्व काही ठाकठीक असताना चितगाव बंदरातून २५ टक्के माल नद्यांतून चालणाऱ्या बोटी पूर्व पाकिस्तानात दूरवर नेत असत. आता ह्या बोटींनाच तुंबून राहिलेल्या सर्व मालाची वाहतूक करावी लागेल आणि हे काम कित्येक महिने करावे लागेल. रस्ते व रेल्वेमार्ग नीट चालू असताना सुद्धा अन्नपदार्थांची दूरवर अंतर्गत वाहतूक करण्यासाठी १० नद्यांवर चालणाऱ्या बोटी लागत असत. पण पाकिस्तान लष्कर सध्या तरी फक्त ४ बोटी ह्या कामासाठी वापरू देत आहे. ह्या सर्व घटनांची पश्चिम पाकिस्तानातील प्रतिक्रिया अर्थपूर्णच म्हणावी लागेल. कराचीतील एक प्रमुख उद्योगपती म्हणतो की, पश्चिम पाकिस्तानने आपली वसाहत गमावली आहे. पश्चिम पाकिस्तानातील ६० टक्के माल पूर्व पाकिस्तानात विकला जात असे. यादवी सुरू झाल्यापासून प. पाकिस्तानातून पूर्व पाकिस्तानात कापसाची होणारी निर्यात पूर्णपणे थांबली आहे. उभयता विभागांतील कापसाचा व्यापार दरसाल सुमारे ३८ ते ५२ कोटी रुपयांचा आहे. तागाची कथाही अशीच आहे. ताग उत्पादकांना अशी भीती वाटत आहे की त्यांची परदेशी गिऱ्हाइके तागाऐवजी कृत्रिम धागे वापरू लागतील. कारण, पाकिस्तानकडून होणाऱ्या तागाच्या आयातीची अनिश्चितता त्यांना जाणवू लागल्यावर ते दुसरे मार्ग शोधू लागतील.

---

## प्लॅस्टिकच्या घड्याळांचा अवतार

अलीकडे नव्याने उदयास आलेल्या उद्योगधंद्यांत प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करण्याचा धंदा फोफावत चालला आहे. भारतामधील शहरांतून प्लॅस्टिकपासून तयार करण्यात आलेल्या अनेक प्रकारच्या उपयुक्त वस्तू नजरेस पडतात. ह्या धंद्यात सध्यातरी स्वित्झरलंडने आघाडी मारलेली दिसते. प्लॅस्टिकचा उपयोग करून घड्याळे बनविण्यास त्या देशातील कारखान्यांनी प्रारंभ केला आहे. घड्याळांच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत अतिशय स्पर्धा होऊ लागल्यामुळे तेथील कारखानदारांना टिकून राहण्यासाठी काही तरी करणे आवश्यक वाटू लागले होते. आफ्रिका आणि आशिया खंडांतील घड्याळांची बाजारपेठ गेल्या काही वर्षांत जपानने काबीज केलेली आहे. स्वित्झरलंडने बनविलेली प्लॅस्टिकची घड्याळे स्वस्त असल्याने ती लवकरच पुन्हा आपला जम बसवितील अशी अपेक्षा करण्यात येत आहे. धातूपेक्षा प्लॅस्टिक वळविणे अगर इतर रीतीने वापरणे अधिक सोपे असल्याने स्वित्झरलंडने नव्या घड्याळांचे कारखाने जास्तीत जास्त प्रमाणात स्वयंचलित केले आहेत. ह्या घड्याळात लागणाऱ्या मुख्य कमानी अजूनही धातूच्याच बनविण्यात येतात. परंतु इतर सर्व सूक्ष्म भाग प्लॅस्टिकचे असतात. ह्या घड्याळात फक्त ५२ सुटे भाग असतात. नेहमीच्याच घड्याळात त्यांची संख्या ९६ असते. त्यामुळे त्यांच्या किमती खूप कमी ठेवणे शक्य झाले आहे. जपानसारख्या देशाला अशी घड्याळे बनविता येतील. मग पुन्हा स्वित्झरलंडच्या मालाला स्पर्धा जड जाऊ लागेल.

---

## सिगारेट्समध्ये डी. डी. टी. चा आढळ

पिकांवरील रोगराईचा नाश करण्यासाठी डी. डी. टी. सारख्या जंतुनाशकांचा उपयोग करण्यात येतो. जपानमधील टोकिओ महानगरपालिकेच्या आरोग्याधिकाऱ्यांनी त्या देशात विकल्या जाणाऱ्या काही सिगारेट्सची तपासणी केली. तेव्हा त्यामधील अनेक उत्पादकांच्या सिगारेट्सच्या तंबाखूत त्यांना डी. डी. टी. आढळून आली. महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत जपानमध्ये तयार करण्यात येणाऱ्या २१ सिगारेट्सच्या प्रकारांची व परदेशांतून आयात होणाऱ्या २० प्रकारांची तपासणी करण्यात आली. त्यामधील डी. डी. टी. चे प्रमाण आरोग्याला बाधक होण्याइतके आढळून आले.

---

## समुद्रापासून अन्न मिळविले तरच माणूस जगेल

लोकसंख्येची स्फोटाप्रमाणे होणारी वाढ हा सर्व जगात एक चिंतेचा विषय झालेला आहे. धार्मिक आवाहनाप्रमाणे आत्मसंयमनाने प्रजोत्पादनाला आळा घालण्याचे प्रयत्न फसले आहेत. पारमार्थिक भाषेत बोलावयाचे तर माणसाच्या वासनेचा पसारा त्याच्याच नाशाला कारणीभूत होण्याची चिन्हे दिसत आहेत. भूगोलावर आधीच जमिनीपेक्षा पाण्याची व्याप्ती अधिक आहे. म्हणजे लोकसंख्येच्या वाढीबरोबरच नवीन जमीन उपलब्ध करून देण्याची किमया शास्त्रज्ञही करू शकत नाहीत. अशा परिस्थितीत असलेल्या जमिनीतून अधिकाधिक अन्नपदार्थ उत्पादन करण्याचे प्रयत्न होणे स्वाभाविक आहे. पण ह्या प्रयत्नांनाही मर्यादा आहे. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करून अमेरिकेतील मिआमी विद्यापीठातील सागरीजीवन विषयाच्या एका शास्त्रज्ञाने असा सिद्धांत मांडला आहे की मनुष्य जातीला पृथ्वीतलावर नांदावयाचे असेल तर अखेर सागरोत्पन्न अन्नपदार्थ मोठ्या प्रमाणात मिळवावे लागतील; नाहीतर अन्नाअभावी मनुष्य जातीचा विनाश अटळ आहे. भूक भागविण्यासाठी समुद्राकडे धाव का व कशी घ्यावी लागेल ह्याचे विवेचन त्यांनी आपल्या अलीकडे लिहिलेल्या एका ग्रंथात केले आहे. आपल्या प्रतिपादनात ते म्हणतात की, भूमीपासून मिळणाऱ्या अन्नपदार्थांचे व लोकसंख्येचे प्रमाण अतिशय व्यस्त झालेले आहे. हैड्रोजनबाँबच्या युद्धकालीन स्फोटापेक्षाही लोकसंख्येची अनिर्बंध वाढ धोक्याची झालेली आहे.

सध्या समुद्रापासून मिळू शकणाऱ्या अन्नपदार्थांची निर्मिती जितकी व्हावयास पाहिजे तितकी होत नाही. अन्नपदार्थांच्या एकूण उत्पादनापैकी २ ते ३ टक्केच पदार्थ सागरापासून मिळविण्यात येत आहेत. वस्तुतः सागर हे अन्न पदार्थांचे फार मोठे कोठार आहे. जगाच्या सध्याच्या लोकसंख्येला पुरेल इतके अन्न सागरापासून मिळविता येण्यासारखे आहे. लोकसंख्या सध्याच्या वेगाने वाढत राहिली तर इ. स. २,००० च्या सुमारास ती ७५० कोटींच्या घरात जाईल, म्हणजे सध्याच्या दुपटीपेक्षाही अधिक होईल. इ. स. २०३५ च्या सुमारास लोकसंख्या १२०० कोटी इतकी फुगेल. जगात काही भूभागात अन्नाची मोठी टंचाई आहे. तेथील लोक खरोखरीचे भुकेले आहेत. ह्या भूभागात सध्या जितके अन्न लागते त्याच्या चौपट अन्न इ. स. २,००० च्या सुमारास लागेल. आणि तरीही त्यांची भूक पूर्णपणे शमविता येईल असे नाही. पशूंपासून मिळणाऱ्या अन्नपदार्थांतून माणसाला प्रथिनयुक्त खाद्याचा लाभ होतो. प्रथिनयुक्त पदार्थ माणसाला अत्यंत आवश्यक असल्याचे सर्वमान्य आहे. इ. स. २,००० च्या सुमारास ह्या अन्नपदार्थांची गरज सहापटीने वाढेल. ती भागविण्याचा एक मार्ग म्हणजे समुद्राची अधिक चांगली मशागत होय.

---

## पूर्व बंगालमधील यादवीचा आर्थिक ताण

आसामचे अर्थमंत्री श्री. त्रिपाठी ह्यांनी असे निदान केले आहे की बांगला देशाच्या स्वातंत्र्य सैनिकांनी आपला लढा ४ महिन्यांपेक्षा अधिक चालू ठेवला तर पाकिस्तानची आर्थिक व्यवस्था आणि लष्करी सामर्थ्य कोसळल्याशिवाय राहणार नाही. ते म्हणाले की परदेशात काम करणारे अनेक पूर्व बंगाली आहेत. ते परदेशात काम करून दर साल ९० कोटी रुपये परदेशी चलन मिळवितात व पाकिस्तानात पाठवितात. हा पैसा पाकिस्तानच्या बँकांत न ठेवता आंतरराष्ट्रीय बँकांमार्फत पाठविणे सुरू झाल्यास पाकिस्तानची परदेशीय चलनाबाबतची कोंडी पूर्ण होईल. तथापि पाकिस्तानच्या परदेशी हुंडणावळीची पूर्ण कल्पना कोणासही नाही.

---

## गौतम बुद्धाच्या जन्मस्थानाचा विकास

नेपाळ व भारत ह्यांच्या सरहद्दीवर लुंबिनी हे बुद्धाच्या जन्माचे ठिकाण आहे. ह्या ठिकाणाचा विकास करून तेथे एक स्मारक उभारण्याचा आंतरराष्ट्रीय प्रयत्न चालू आहे. ज्या देशांना ह्या कार्याबद्दल आस्था आहे त्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद जपानमध्ये भरविण्यात येणार आहे. परिषद बहुधा टोकिओ येथे येत्या ऑगस्ट महिन्यात भरेल. त्या वेळी लुंबिनी व त्याच्या आसपासचा परिसर ह्यांचा विकास करण्याची एक मोठी योजना आखण्यात येईल. एका जपानी स्थापत्य शास्त्रज्ञाने लुंबिनीची नुकतीच पाहाणी केली आहे. योजना अमलात आणण्यासाठी अनेक बुद्धधर्मीय देश मदत करणार आहेतच. पण त्याशिवाय संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विद्यमाने योजनेच्या खर्चासाठी सुमारे ५.६ कोटी डॉलर्स मिळावयाचे आहेत. त्यामुळे योजना अमलात आणणे सुलभ होणार आहे.

---

## विजेवर चालणाऱ्या मोटारींसाठी संशोधन

विजेच्या साह्याने चालणाऱ्या व नेहमी सहज वापरता येतील अशा मोटारी तयार करण्यासाठी जपानच्या सरकारने येत्या ५ वर्षांत १० लाख डॉलर्स खर्च करण्याचे ठरविले आहे. तेलावर चालणाऱ्या मोटारीतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे विशेषतः मोठ्या शहरातील हवा आरोग्यास बाधक होते. म्हणून वीजमोटारीचा शोध करण्यात येत आहे. आजही अशी मोटार तयार करण्यात शास्त्रज्ञांनी व तंत्रज्ञांनी यश मिळविले आहे. परंतु त्यात एक फार मोठा दोष आहे. तो असा की मोटारीसाठी लागणारी शक्ती विजेरीपासून मिळवावी लागते. ही विजेरी वजनाने फार भारी असते; शिवाय तिची शक्ती देण्याची पात्रता मधून मधून भरपाई करून घ्यावी लागते. त्यामुळे आजच्या विजेच्या मोटारगाड्या व्यवहारात आणण्यासारख्या नाहीत.

---

## रेल्वे अर्थसंकल्प

(आकडे कोटी रुपयांचे)

| | पक्के आकडे १९६९-७० | दुरूस्त अंदाज १९७०-७१ | अर्थसंकल्प १९७०-७१ | अर्थसंकल्प १९७१-७२ मार्चमध्ये सादर केलेला | अर्थसंकल्प १९७१-७२ आताचा संकल्प |
|---|---|---|---|---|---|
| वाहतुकीचे एकूण उत्पन्न | ९५१·२८ | १००४·०० | १००१·९३ | १०४४·०० | १०६०·२५ |
| चालू खर्च निव्वळ | ६८४·९४ | ७३१·७६ | ७३०·४१ | ७६५·४४ | ७६५·४४ |
| महसुलातून घसारा राखीव निधीत टाकलेली रक्कम | ९५·०० | १००·०० | १००·०० | १०५·०० | १०५·०० |
| सेवा निवृत्ती वेतन फंडास जमा केलेली रक्कम | १०·०० | १५·०० | १५·०० | १५·०० | १५·०० |
| निव्वळ संकीर्ण खर्च | १४·७८ | १५·१२ | १४·५० | १७·९१ | १७·९१ |
| एकूण | ८०४·७२ | ८६१·८८ | ८६०·०० | ९०३·३५ | ९०३·३५ |
| निव्वळ रेल्वे महसूल | १४६·५६ | १४२·१२ | १४१·९३ | १४०·६५ | ५६६·९० |
| रेल्वेत गुंतलेल्या भांडवलावरील लभ्यांश | १५६·३९ | १६५·८१ | १६५·८१ | १७३·७७ | १७३·७७ |
| निव्वळ शिल्लक तूट (−) | (−) ९·८३ | (−) २३·६९ | (−) २३·८८ | (−) ३३·१२ | (−) ६·८७ |

---

### श्री. मसानींची श्रीमंतांवर कडक टीका

मुंबई ज्युनिअर चेंबर ह्या संघटनेपुढे प्रश्नोत्तररूपाने आपले विचार व्यक्त करताना स्वतंत्र पक्षाचे पुढारी श्री. एम्. आर. मसानी ह्यांनी श्रीमंत वर्गावर कडक टीका केली आहे. ते म्हणाले की, मालमत्तेवाला श्रीमंत वर्ग आणि बुद्धिजीवी लोक विश्वासघातकी, स्वयंकेंद्रित आणि लोभी आहेत. त्यांनी देशातील सामान्य लोकांचा विश्वास पूर्णपणे गमावला आहे. गेल्या वीस वर्षांच्या अवधीत समाजातील वरिष्ठ वर्ग थोडा जबाबदारीने वागला असता आणि त्यांनी आपल्या स्वार्थाला थोडी जरी मुरड घातली असती तर कम्युनिझमचा धोका आज जितका वाटतो तितका वाटला नसता. पण आता मात्र कम्युनिझमच्या धोक्याने प्रत्यक्षात पदार्पण केले आहे. बँकांच्या व विम्याच्या राष्ट्रीयीकरणानंतर आता बहुधा सुप्रीम कोर्ट आणि प्रेस ह्यांच्यावर गदा येईल.


# Fergusson College, Poona 4

The College will reopen on the 15th June, 1971 for the academic year 1971-72. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examinations are declared.

From June 1971, the college proposes to introduce the following courses :—

1. P. D. Commerce.
2. Geography at the S. Y. B. A.
3. Students of this College seeking admission to S. Y. B. Sc. class should ensure their admission *immediately.*

May 25, 1971. Principal
Saur Jeshta 4, 1893.

---

# म. ए. सो. वाणिज्य महाविद्यालय, पुणे ४.

१५ जून १९७१ पासून नव्या वर्षाची सुरुवात.

चालू वर्षी एम्. कॉम्. पार्ट २ शिकविण्याची सोय.

विविध वर्गासाठी १ जून नन्तर प्रवेशाची सुरुवात.

माहितीपत्रक ७५ पै. किमतीस कचेरीत व १ रु. स पोस्टल स्टँम्स् पाठविल्यास उपलब्ध.

श. बा. चिरमुले
प्राचार्य

---

# नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे १

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर हे कॉलेज दि. १५ जून रोजी सुरू होईल.

कॉलेजमध्ये प्रीडिग्रीपासून बी. कॉम. पदवी आणि एम्. कॉम् पदवीपर्यंतचे सर्व वर्ग आहेत.

इंग्रजी आणि मराठी दोन्ही माध्यमे. सरकारी आणि इतर शिष्यवृत्त्या आणि सवलती अनेक आहेत. गरीब विद्यार्थी, हुशार विद्यार्थी आणि उत्तम खेळाडूंना विशेष मदत केली जाते.

कॉलेजचे माहितीपत्रक टपालखर्चासकट रु. १—५० किमतीला मिळू शकेल.

भा. शं. भणगे
प्राचार्य

## रेल्वेजच्या कारभारासंबंधी काही महत्त्वाचा तपशील

भारतीय रेल्वेतील वजनाच्या हिशोबाने ६० टक्के वाहतूक व ४० टक्के ब्रॉड गेज वाघिणी ज्या पूर्व व आग्नेय रेल्वे विभागात धावतात तेथील परिस्थिती अजूनही चिंताजनकच आहे. वाहतुकीत दररोज होणाऱ्या अडथळ्यामुळे सर्व कामकाजच थंडावल्यासारखे झाले आहे. ब्रेक बीम्स, बेअरिंग्ज व इतर वस्तू यांच्या चोऱ्यामुळे शेकडो वाघिणी पडून आहेत आणि मार्गावरील तारा चोरल्यामुळे पूर्व विभागासारख्या गर्दीच्या मार्गावर मालगाड्या तासन् तास खोळंबून राहतात. बंगाल बिहारच्या कोळसा खाणीत दररोज जेथे ६,५०० वाघिणी भरावयास हव्या तेथे गेल्या काही महिन्यात जेमतेम ५,५०० वाघिणी भरल्या जातात. त्यामुळे उद्योगधंदे, विद्युतनिर्मिती, वीटांच्या भट्या यांना कोळसा पुरवठा समाधानकारक होत नाही. अन्नधान्याच्या वाहतुकीवरही दुष्परिणाम होतो.

काही इतर अडचणींमुळे रेल्वेच्या आर्थिक कार्यक्षमतेवर परिणाम होतो. काही सामाजिक बोजाही रेल्वेवर लादण्यात आला आहे. किफायतशीर नसलेल्या मार्गावर वाहतूक चालू ठेवावी म्हणून रेल्वे ८ कोटी रुपयांचे नुकसान सोसते. प्रवाशी वाहतुकीवरील तोटा ५९ कोटी रुपयांच्या घरात गेला. प्रत्यक्ष खर्चापेक्षा प्रवासी वाहतुकीचा दर कमी आहे. मुंबई, मद्रास व कलकत्ता शहरांच्या उपनगरातून प्रवास करणारे उतारू मासिक व त्रैमासिक पास काढतात त्याचा आकार एवढा कमी असतो की त्यासाठी रेल्वे १२ कोटी रुपये नुकसान सोसत असते. दरसाल रेल्वे वाहतुकीवरील खर्च वाढत आहे. माल वाहतूक व उतारू भाडे यापासून रेल्वेला मिळणारे उत्पन्न आणि कामकाजी खर्च यात मोठे अंतर पडत आहे.

रेल्वेच्या कामकाजी खर्चापैकी ६० टक्के खर्च कर्मचाऱ्यांवर होतो. या खर्चात १९६३–६४ पासून ७२ टक्के वाढ झाली आहे. परंतु याच कालावधीत उतारू भाड्यात व माल भाड्यात फक्त अनुक्रमे १९·६ व २२·७ टक्के वाढ झाली. म्हणजेच कामकाजी खर्चात झालेल्या वाढीपैकी फक्त २६ टक्के वाढ दरवाढीतून भरून काढण्यात आली आहे.

रेल्वेमध्ये सध्या असलेले चार प्रकारचे गेज हे प्रगतीला अपकारक असून, शक्य तितक्या लवकर हे लोढणे काढून टाकले पाहिजे असे सांगून रेल्वेमंत्री म्हणाले की, ३ हजार रूट कि. मी. मार्गांचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर करण्याची १५ वर्षांची योजना रेल्वेने आखली आहे. त्यासाठी १७५ कोटी रुपये खर्च येईल. त्यापैकी १५ कोटी रुपये चालू योजनेत राहतील व त्यातील ७·५३ कोटी रुपये खर्चही झाले आहेत.

## रेल्वे उतारू भाड्यातील वाढ

रेल्वेमंत्र्यांनी दरवाढीसाठी पुढील सूचना केल्या आहेत :—

१. पहिल्या १५ किलोमीटर प्रवासासाठी कोणत्याही वर्गाच्या दरात वाढ नाही.

२. सीझन तिकिटांच्या दरातही बदल नाही.

३. १६ ते ३० किलोमीटर अंतरासाठी तिसऱ्या वर्गाच्या साध्या भाड्यात ५ पैसे व मेल, एक्स्प्रेस गाड्यांच्या भाड्यात १५ पैसे वाढ.

४. ३१ ते ५० किलोमीटरसाठी अनुक्रमे १० व २० पैसे वाढ. तिसऱ्या वर्गाच्या साध्या भाड्यांत २०० किलोमीटरहून अधिक प्रवासासाठी जास्तीत जास्त फक्त २५ पैसे वाढ असून मेल एक्स्प्रेस गाड्यांच्या तिकिटात १ हजार किलोमीटर वरील अंतरासाठी जास्तीत जास्त १ रु. वाढ आहे. म्हणजेच दिल्लीपासून मुंबई, कलकत्ता किंवा मद्रासला जाण्यासाठी तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना फक्त १ रु. जास्त द्यावा लागेल. या सूचनांमुळे रेल्वेचे उत्पन्नात ११·६० कोटी रु. नी वाढ होईल.

वरच्या वर्गाच्या उतारू वाहतुकीतही वाढ सुचविण्यात आली आहे.

दरवाढीच्या या सूचनांमुळे संपूर्ण वर्षात ३९ कोटी रुपये अधिक उत्पन्न येईल. परंतु हे दर येत्या १ जुलैपासून अमलात येणार असल्यामुळे चालू आर्थिक वर्षात त्यामुळे २६·२५ कोटी रुपये मिळतील व तूट ६·८७ कोटी रुपये राहील.

### तिकिटांच्या करवाढीचा तक्ता

| प्रवासी वर्ग | १-१५ कि.मी. | १६-३० कि.मी. | ३१-५० कि.मी. | ५१-१०० कि.मी. | १०१-२०० कि.मी. | २०१-५०० कि.मी. | ५०१-१००० कि. मी. | १००१ कि.मी. च्या वर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरा वर्ग ( साधा ) | | ०·५ | ०·१० | ०·१५ | ०·२० | ०·२५ | ०·२५ | ०·२५ |
| तिसरा वर्ग (मेल वा एक्स-प्रेस ) | | ०·१५ | ०·२० | ०·२५ | ०·२५ | ०·५० | ०·७५ | १·०० |
| वातानुकुलीत खुर्ची | | ०.५० | ०·५० | १·०० | १.५० | १·५० | २·०० | २·०० |
| दुसरा वर्ग ( साधा ) | | ०.५० | ०·५० | ०·५० | ०·५० | १·०० | १·५० | २·०० |
| दुसरा वर्ग (मेल वा एक्स-प्रेस ) | | ०·५० | ०·५० | १·०० | १·०० | १·५० | २·०० | २·०० |
| प्रथम वर्ग | | ०·५० | ०·५० | १·०० | १·०० | २·०० | २·५० | ३·५० |
| प्रथम वर्ग (वातानुकुलीत) | | १.०० | १·०० | २·०० | २·०० | ४·०० | ५·०० | ७·०० |




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)